Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# अष्टपैलू व्यक्तिमत्व - यशवंतराव चव्हाण

**प्रा. डॉ. महादेव गणपत देशमुख**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,
यशवंतराव चव्हाण, महाविद्यालय,
तुळजापूर, जि. उस्माणाबाद.
mahadevdeshmukh007@gmail.com

**प्रस्तावना :**

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार या शब्दांतून यशवंतराव चव्हाणांच्या कर्तृत्वाचा उल्लेख केला जातो. त्या अतिशयोक्ती नाही. आधुनिक महाराष्ट्र अनेकांनी घडविला. आपापल्या व्यक्तिमत्वाची मुद्रा अनेकांनी महाराष्ट्रावर उमटवली, पण महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक जीवनावर मुख्यत: यशवंतरावांचा प्रभाव अलिकडच्या कालखंडात अधिकांशाने पडला यात संशय नाही. यशवंतरावांच्या मन:पिंडावर उत्तम, सकस साहित्याचे संस्कार झाले होते. त्यांचे साहित्यविषयक चिंतन सखोल आणि मर्मस्पर्शी होते. म.फुले, आगरकर, प.नेहरु आणि डॉ. आंबेडकर यांचे वैचारिक साहित्य त्यांच्या व्यक्तीमत्वाच्या उभारणीला निश्चितच सहाय्यक झाले. ज्या कालखंडात यशवंतराव जन्मले आणि वाढले, त्या काळातल्या विविध चळवळींशी त्यांचा जवळून संबंध आलेला होता. त्यामुळे यशवंतरावांच्या दृष्टीत आणि वृत्तीत एक प्रकारची उदारता, प्रगल्भता आाली होती. सत्तेच्या स्पर्शाने मदोन्मत्त होणारी एक प्रवृत्ती असते. अहंकाराचा वारा लागला की मोठमोठे राजकारणी, मुत्सद्दी आपला तोल हरवून बसतात, पण अनेक वर्ष सत्तेच्या स्थानांवर राहून सुध्दा आणि प्रचंड लोकप्रियता लाभूनसुध्दा यशवंतरावांच्या मनाला अहंगंडाचा लवलेषही नव्हता. याचे कारण त्यांच्यावर उत्तम साहित्याने, त्या काळातील गांधी, नेहरुंच्या नेतृत्वाने काही भरीव संस्कार केले होते.

यशवंतरावांनी त्यांच्या *कृष्णाकाठ* या आत्मकथनात म्हटले आहे की, शैक्षणिक जीवनातल्या व्यक्तिंचा प्रभाव हा बराच काळ टिकून असतो व एका अर्थाने तो अविस्मरणीय असतो. कारण त्यांच्याकडून घेतलेले संस्कार हे कायम टिकणारे संस्कार असतात. कोल्हापूरची उच्च शिक्षणाची चार वर्षे माझ्या आयुष्यातील पायाभूत आणि गतिमान अशी वर्षे आहेत. आता माझे वाचन मर्यादित राहिले नव्हते, काय वाचावे आणि काय वाचु नये असा संभ्रम आता वाटत नव्हता. या बाबतीत माझ्या दिशा कायम झाल्या होत्या आणि योजनापूर्वक काही वाचावे असे मी ठरविले होते. राजकारण, इतिहास आणि वाड्मय या विषयाची निवडक पुस्तके मी शोधू लागलो, कोल्हापुरच्या लायब्ररीत कित्येक तास बसून ती वाचूही लागलो, माझे मन सांस्कृतिकदृष्ट्या सुसंपन्न करण्याचा प्रयत्न करीत होतो.

यावरुन यशवंतरावांचे वाचनावरील प्रेम आणि वाचनाचे त्यांच्याठायी असलेले महत्व याची प्रचीती येते. त्यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण होण्यात वाचनाचा मोठा वाटा असल्याचे दिसते. यशवंतरावांचा समावेश व्यासंगी, सुसंस्कृत अभिरुचीच्या राजकारणी व्यक्तीत करावा लागतो. प्रगतिवादी सामाजिक चळवळींना त्यांनी खतपाणी घालून त्या वाढविल्या, लोकाभिमुख दृष्टिचा हा नेता महाराष्ट्राच्या जनतेशी पूर्णपणे समरस झालेला होता. एक राज्यकर्ता या नात्याने त्यांची प्रतिमा जनमानसात स्वच्छ राहिली, याचे कारण विद्यार्थीदशेपासून त्यांच्यावर वैचारिक आणि ललित साहित्याचे तसेच ध्येयवादी समाजसुधारकांच्या कार्याचे, प्रखर देशभक्तांच्या त्यागाचे व चारित्र्याचे संस्कार होऊ शकले हेच आहे.

यशवंतरावांच्या एकुणच वाचन, साहित्य या विषयीच्या वाटचालीचा आणि यातुनच त्यांचे विचार व व्यक्तिमत्वात आलेल्या स्थैर्याचा, प्रगल्भतेचा इतिहास याचा उहापोह केला आहे, त्यांची शैक्षणिक वाटचाल आणि त्यातुन शिक्षणासंदर्भातील विकसित होत गेलेले विचार याचा आढावाही या लेखात घेण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. यशवंतराव चव्हाणांच्या शैक्षणिक विचारांचा आढावा घेणे.
२. यशवंतरावांचे साहित्यप्रेमी पैलू अभ्यासणे.

**संशोधनाची गृहितके :**

१. यशवंतराव चव्हाणांनी शिक्षण क्षेत्रास नवी दृष्टी व दिशा देण्याचे कार्य केले आहे.
२. यशवंतराव चव्हाण हे साहित्यप्रेमी व्यक्तिमत्व होते.

**बालपणातील शिक्षणविषयक संस्कार :**

यशवंतरावांच्या व्यक्तिमत्वात त्यांच्या बालपणाचा आणि बालपणात आईने त्यांच्यावर केलेल्या संस्कारांचा ठसा त्यांच्या संपूर्ण आयुष्यावर पडल्याचे आपल्याला दिसते. शिक्षण ही प्रत्येकाच्या आयुष्यातील एक महत्वपूर्ण प्रक्रिया आहे. शिक्षणाच्या शक्तीचे बाळकडू त्यांना त्यांच्या आईकडून मिळाले, यासंदर्भात कृष्णाकाठ या आपल्या आत्मचरित्रात ते लिहितात की, माझ्या थोरल्या बंधुंना नोकरी मिळाल्यानंतर ते काही दिवस कराडमध्ये होते नंतर त्यांची बदली होऊन ते विट्याला गेले, परंतू माझ्या आईने निर्णय घेतला, की दोन्ही धाकटी मुले घेऊन कराडलाच राहावे आणि त्यांचे शिक्षण पूर्ण करावे, माझ्या आईचा हा एक ध्यास होता, तिने स्विकारलेला मंत्र होता, की शिक्षण ही शक्ती आहे, ती मिळवली पाहिजे. आपल्या मुलांचे शिक्षण पुर्ण केले पाहिजे. या दृष्टीने तिने घेतलेला निर्णय आमच्या आयुष्याला दिशा द्यायला मुळ कारणीभुत आहे. माझी आई शाळेत शिकली नव्हती, पण शिक्षणाचे मोल ती मनोमन जाणत होती. आमच्या घरची तशी गरिबीच असली, तरी संस्कारांनी आई श्रीमंत होती, ही श्रीमंती मुलापर्यंत पोचविण्याचा तिचा सततचा प्रयत्न होता.[१] यावरुन यशवंतरावांच्या मनावर अगदी घरापासूनच शिक्षणाविषयीचे महत्व कळण्यास सुरुवात झाली यातूनच पुढे वाचनाची आवड निर्माण झाली.

**जेल हे विद्यापीठ :**

यशवंतरावांना शालेय जीवनातच वाचनाचा छंद जडला होता. वृत्तपत्रे, मासिके, कादंब-या, कवितासंग्रह इ. सर्वच साहित्य ते नियमित वाचत असत, यातूनच ह्या वेळच्या सामाजिक घडामोडीं वाचनात येत असत. विविध चळवळीमध्े त्यांचा सहभाग असे. १९३०-३२ साली कायदेभंगाच्या चळवळीमध्ये इयत्ता १० वीत असतांना त्यांनी सहभाग घेतला त्यासाठी त्यांना १८ महिन्याचा तरुंगवास भोगावा लागला. याचवेळी ते जेलमध्ये गेले तेव्हा कारागृहामध्ये निरनिराळे देशभक्त जमले होते. आचार्य भगवंतासारखी मंडळी त्याठिकाणी व्याख्याने देत निरनिराळ्या विषयावर वाद होत असत. समाजवाद, लोकशाही, हुकुमशाही म्हणजे काय याची चर्चा होत असे.

साहित्याच्या संदर्भातही त्या ठिकाणी चर्चा होत. गडकरी, केशवसुत, आचार्य अत्रे इ. लेखकांच्या साहित्यावर चर्चा होत. कारागृहामध्ये सत्याग्रही देशभक्तांचा एक मेळावाच होता. त्यामध्ये शिकलेले विद्वान असत. विद्यार्थीही होते. त्यांच्यापासून ते शिकले.[२] या काळात त्यांनी त्यांची शिक्षणाची तृष्णा या संवादातून, चर्चेतून शमविली आणि वैचारिक प्रगल्भता वाढवली. यशवंतराव म्हणतात, या जेलमध्ये काढलेले एक वर्ष म्हणजे माझ्यसाठी एक प्रकारे विद्यापीठजीवन होते.[३] शिक्षेच्या कालावधीतही सकारात्मक दृष्टीने बुध्दीची कवाडं उघडी ठेऊन शिकण्याची प्रबळ इच्छा या मताद्वारे स्पष्ट होते.

**ग्रंथ हेच गुरू :**

यशवंतराव विद्यार्थीदशेत वेगवगळ्या क्षेत्रात वावरत होते. त्यावेळी माणसे आणि वेगळ्या वातावरणामुळे त्यांच्या अनुभवात भर पडत होती. वाचनाने चांगले संस्कार मनावर झाले. त्यांचे बालपण जरी खेड्यात गेले असले तरी वाचणाची आवड लहानपणीच निर्माण झाली होती. लहानपणी यशवंतराव आईबरोबर रामायण, महाभारताची पारायणे करत तसेच कीर्तने ऐकण्यास जात असत. आईकडून नेहमीच या धार्मिक ग्रंथातील कथा ते ऐकत असत, त्यामुळे त्यांच्या मनाला नविन जाणिवांचा लाभ होई. या कथावाचनाचा उपयोग त्यांनी स्वत:चे जीवन घडविण्यासाठी केला. लोकमान्य टिळक हायस्कूलमध्ये शिकत असताना टिळकांचे चरित्र आणि विचार समजून घेण्यासाठी यशवंतरावांना पुस्तके वाचाविच लागत, त्या हायस्कुलमध्ये प्रतिवर्षी टिळकांच्या जीवन आणि कार्यावर निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा घेतल्या जात. तेथील शिक्षक राष्ट्रीय वृत्तीचे असल्यामुळे त्यांच्यात देशातील

चळवळीसंबंधी चर्चा होत,तसेच त्यावेळी कराडमधील व्यापारी लाड यांच्या दुकानात विविध वृत्त व ज्ञानप्रकाश यांसारखी वर्तमानपत्रे येत असत. त्यामुळे यशवंतरावांचा कल गंभीर वाचनाकडे वळला.[४] राष्ट्रीयतेकडे, चळवळीकडे त्यांचा प्रवास त्यांच्या वाचनामुळे व लाभलेल्या शैक्षणिक वातावरणामुळे सुरु झाल्याचे दिसते. यशवंतरावांच्या बंधुंच्या मनाची पकड त्यावेळी सुरू असलेल्या सत्यशोधक चळवळीने घेतली होती आणि त्याचा असा प्रयत्न होता की, यशवंतरावांनी या चळवळीत आघाडीवर राहून काम करावे, पण हे अभ्यास आणि अभ्यासाव्यतिरिक्त अन्य वाचन यात गढलेले असत. त्यांचे मन सत्यशोधक समाजाच्या चळवळीकडे वळले नाही.[५] यशवंतराव हे फक्त एका वर्गावर टिका करुन उणीदुणी काढूण व्देष करण्याच्या विरुध्द असल्याचे दिसते.

**अस्पृश्यासाठी रात्रशाळेचा प्रयोग :**

**मॅ**ट्रिक पास झाल्यावर पुढील शिक्षणासाठी यशवंतरावांनी कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये प्रवेश मिळविला. तेथे त्यांना डॉक्टर बाळकृष्ण हे नामवंत प्राचार्य लाभले,त्यांची आपल्याशी चांगली ओळख व्हावी म्हणून ते धाडस करुन प्राचार्यांच्या घरी गेले स्वत:ची ओळख त्यांना करुन दिली, प्राचार्यांना त्यांचे विचार विशेष वाटले यात शंकाच नाही, तेव्हा बोलतांना ते म्हणतात, शिक्षण घेत असतांना आपण समाजासाठी काहीतरी करावे असे वाटते, त्याचबरोबर आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळावे, असे वाटते, देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्याला काही करता आले तर करावे असा मनोदय आहे.[६] मॅट्रिकचा अभ्यास सुरु असतांनाच अस्पृश्यांना सक्षम करण्यासाठी त्यांनी रात्रशाळा काढली होती. दुदैवाने हा प्रयोग नंतर बंद झाला. त्याला म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नाही. यशवंतरावांना समाजातील प्रत्येक स्तरांत शिक्षण पोहचविण्याची इच्छा अगदी शालेय जीवनापासून होती हे या घटनेतून निदर्शनास येते.

**उत्तम शिक्षक होण्याची इच्छा :**

१९३८ साली यशवंतरावांनी बी. ए. ची परिक्षा पास केल्यानंतर पुढे कायद्याचा अभ्यास कुठे करावा असा त्यांच्यापुढे प्रश्न उभा होता, बी. ए. झाल्यावर प्रथम त्यांना असे वाटत होते की, सातारा किंवा कराड येथे एखादे वृत्तपत्र काढून संपादक म्हणून काम करावे किंवा ग्रामीण भागात एखादी शिक्षण संस्था काढून राष्ट्रीय वृत्तीचे उत्तम शिक्षक व्हावे.[७] शिक्षण आणि वाचनाची गोडी यशवंतरावांना होतीच पण समाजात परिवर्तन घडून यावे यासाठी त्यांची तळमळ त्यांच्या विचारातून नेहमीच प्रगट होतांना दिसून येते.

**सामाजिक परिवर्तनासाठी प्रयत्नशीलता :-**

एक राज्यकर्ता या नात्याने यशवंतरावांची प्रतिमा जनमानसात स्वच्छ राहिली. याचे कारण विद्यार्थीदशेपासून त्यांच्यावर वैचारिक आणि ललित साहित्याचे तसेच ध्येयवादी समाजसुधारकांच्या कार्याचे प्रखर देशभक्तांच्या त्यागाचे व चारित्र्याचे संस्कार होऊ शकले हेच आहे. सामाजिक परिवर्तनासाठी प्रयत्नशील असणारा एक विचारवंत व कार्यकर्ता ही त्यांची प्रतिमा जनतेच्या मनात दृढ राहिली.[८] समाजासाठी केलेल्या विविध कार्यापैकी त्यांच्या शैक्षणिक विचारांचा व कार्यांचा जनमनावर प्रभाव राहिला, त्यांचे व्यक्तिमत्व, सामान्य जनतेस ते आपल्यातीलच एक व्यक्ती आहे असे वाटण्यास कारणीभूत ठरले. यातुनच त्यांची समाजांतील प्रतिमा आणि समाजाविषयी त्यांच्या मनातील तळमळ याची प्रचिती येते.

**शिक्षण पध्दतीवर प्रकाश :**

शिक्षण पध्दतीबद्दल भाष्य करताना यशवंतराव म्हणतात, आमच्या शिक्षणाची पध्दती कशी असावी हाही आजचा महत्वाचा प्रश्न आहे. आजपर्यंत आम्ही ज्या त-हेचे शिक्षण घेतले ते शिक्षण चांगले असेल, योग्यही असेल, परंतू त्यामुळे आमच्यात नोकरीपेशाची मनोवृत्ती निर्माण झाली आहे. आम्हाला असे सांगण्यात येते की, आमची बुध्दीच आमचा पिंडच, नोकरीपेशाचा आहे. मला ही गोष्ट मंजूर नाही.[९] शिक्षण पध्दतीमुळे समाजाची जी मानसिकता होती तिच्यावर प्रकाश टाकण्याचे कार्य त्यांनी वेळोवेळी केली.

**शिक्षण हे विकासाचे साधन :**

१९६० मध्ये कॉंग्रेस कार्यकर्त्यांच्या शिबिरामध्ये ते मार्गदर्शन करताना म्हणाले, मी आपणाला सांगु इच्छितो की, शिक्षणाकडे निव्वळ सामाजिक गरजेच्या दृष्टीने मी पाहत नाही. माझ्या मते शिक्षण हे आर्थिक

विकासाचे एक मुलभूत साधन आहे. आमच्यामध्ये शक्ती निर्माण करण्याकरिता आमच्याजवळ मनुष्यबळाशिवाय दुसरे काही साधन नसल्यामुळे आम्हाला या साधनांचा विकास करण्यासाठी त्याला शिक्षणाची जोड द्यावयाची आहे, खेड्यात विद्युत पोहोचविल्याशिवाय ज्याप्रमाणे शेतीचा विकास होणार नाही, त्याचप्रमाणे आमचा नापिक पडलेला मनुष्यबळाचा हा जो थोरला साधनसंपत्तीचा भाग आहे, त्यात शिक्षणाची विज नेल्याशिवाय नवसामर्थ्य निर्माण होणार नाही, शिक्षणाकडे पाहण्याचा माझा स्वत:चा हा असा दृष्टिकोन आहे.[१०] महाराष्ट्राचा विकास करण्यासाठी शिक्षण हे अत्यंत प्रभावी व आवश्यक साधन आहे असे यशवंतरावांचे स्पष्ट मत होते. सर्वांगीन विकास घडवण्यासाठी सर्व स्तरांत शिक्षण पोहोचणे आवश्यक असल्याचे त्यांनी वेळोवेळी सांगितले, यातून त्यांची समाजातील सर्वच बाबतीतील निरिक्षण व अभ्यास याची प्रचिती येते.

महाराष्ट्राचा आर्थिक विकास घडवायचा असेल तर तांत्रिक शिक्षणाचीही कास धरावी लागेल, असे त्यांना वाटत होते. फक्त आम्हाला तांत्रिक शिक्षण, वेगवेगळया शास्त्रांचे शिक्षण घेतले पाहिजे. अशा त-हेच्या शिक्षणाला आम्ही प्राधान्य दिले पाहिजे. याशिवाय ज्याला आपण निव्वळ ह्युमॅनिटीजचे शिक्षण म्हणतो अशा त-हेच्या शिक्षणाचेही महत्व आहेच. ते मुलभुत शिक्षण आम्हाला मंजुर आहे आणि या शिक्षणाच्या बाबतीत शिक्षणाची सारी दारे सताड उघडी करुन ते खालच्या थरापर्यंत पोहोचविण्याचे आमचे ध्येय असले पाहिजे. मी तर असे म्हणेन की, या त-हेच्या शिक्षणाचे प्रकाशझोत अगदी शेवटच्या थरापर्यंत जर आम्ही नेऊ शकलो, तर महाराष्ट्राची शक्ती इतकी जबरदस्त वाढेल की, त्याला कोणाच्याही मेहेरबानीवर अवलंबून राहण्याचे कारण राहणार नाही, तो स्वत:चे रक्षण करील आणि राष्ट्राचेही रक्षण करील.[११] शिक्षणाच्या शक्तीची समाजातील कार्यकारी लोकांना जाणीव करुन देण्याचे कार्य यशवंतरावांनी केले. जेणेकरुन समाजातील प्रत्येक स्तरांत शिक्षण पोहचावे व महाराष्ट्र सर्व दुष्टीने प्रगत होईल.

**अशिक्षित बेकारांपेक्षा सुशिक्षीत बेकार परवडेल :**

शिक्षणाबाबत यशवंतराव नेहमीच आग्रही होते, विद्येची उपासना सर्वांनी करावी, विद्येशिवाय सर्व उद्योग आंधळा आहे, असे त्यांचे मत होते. शिक्षण ही सर्वव्यापक संकल्पना आहे. शिक्षणाचे महत्व अनन्यसाधारण आहे. शिक्षण देण्याच्या त्यांच्या धोरणावरील आक्षेपांना उत्तर देतांना ते म्हणतात, मला अशिक्षित बेकारांच्या फौजेपेक्षा सुशिक्षित बेकारांची फौज परवडेल, कारण ते देशाचे प्रश्न समजावून घेऊन सोडविण्यास मदत करतील.[१२] शिक्षण प्रसारामुळे बेकारी निर्माण झाली तर त्याविषयी मत मांडताना ते म्हणतात की, शिक्षणाच्या प्रसारामुळे देशात बेकारी निर्माण झाली तरी चालेल, परंतू हा सुशिक्षित बेकार निदान विचार तरी करु शकेल आणि आपण बेकार का राहिलो याची तो कारणमीमांसा करुन ती प्रयत्नपूर्वक दूर करण्यासाठी धडपड करील अशी त्यांची दृष्टी होती.[१३] शिक्षणामुळे बेकारी वाढली तरी चालेल पण समाजातील प्रत्येक स्तरांत शिक्षण पोहचावे कारण शिक्षणामुळे विचार करण्याची, मनन करण्याची शक्ती प्राप्त होते आणि या शक्तीमुळे कोणत्याही समस्येवर उपाय शोधण्याची बौध्दीक क्षमता निर्माण होते.

**साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना :**

यशवंतरावांचे वाचनावर नितांत प्रेम होते तसे ते साहित्यप्रेमीही होते, त्यांना साहित्याची विलक्षण आवड होती, तसेच साहित्यिकांवरही त्यांचे निस्सीम प्रेम होते. बुजुर्ग साहित्यिकांची ते आठवण ठेवीत, तसेच नवीन, चांगल्या साहित्यिकांच्या शोधातही यशवंतराव व्यग्र असत. त्यासाठी अफाट वाचन आणि सखोल चिंतनही ते सतत करीत. कला, साहित्य आणि संगीत यांमध्ये त्यांना खुपच रस होता. साहित्य संवर्धन व्हावे यासाठी त्यांनी १९६० साली राज्य साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना केली.

**शैक्षणिक धोरण :**

यशवंतरावांनी मुख्यमंत्री असतांना जाहीर केले की, त्यांच्या कचेरीचा दरवाजा चोवीस तास खुला राहील. त्यांनी स्पष्ट सांगितले की, जनतेचे अज्ञान, दारिद्रय मला कमी करता आले नाही तर या मुख्यमंत्री पदाचा काय उपयोग.[१४] सत्तेत असतांनाही पदाचा गैरवापर न करता जनतेच्या हितासाठी पदाचा उपयोग करण्याची त्यांची तळमळ आणि कार्य त्यांच्या कृतीतून स्पष्ट होते. शैक्षणिक धोरणाबद्दल त्यांनी क्रांतीकारी निर्णय घेतले,

त्यातीलच एक महत्वाचा निर्णय म्हणजे, १२०० रुपये उत्पन्नाखाली असलेल्यांना फीची सवलत हा होय, असा क्रांतीकारी निर्णय घेणारे यशवंतराव हे पहिलेच मुख्यमंत्री होते आणि असा निर्णय राबवणारे महाराष्ट्र हे संपूर्ण भारतातील पाहिलेच राज्य होते.

**सारांश :**

यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्रातील राजकारणातील अत्यंत महत्वाचे नेते होते. त्यांचा उल्लेख केवळ राजकारणी म्हणूनच नव्हे तर अष्टपैलु व्यक्तिमत्व म्हणून केला जातो, ते राजकारणाबरोबरच साहित्य क्षेत्रातही तितकेच लोकप्रिय होते. बालपणापाससूनच वाचनाची आवड असल्यामुळे त्यांना ग्रंथ, चरित्रे, आत्मचरित्रे, कविता, कादंब-या इ. वाचनाची सवय होती. त्यांचे व्यक्तिमत्व घडण्यामागे सभोवतालच्या वातावरणाचा जितका सहभाग आहे, तितकाच वाटा ग्रंथांचा असल्याचे ते मानत असत. वाचनामुळे त्यांना विचार, चिंतन आणि मनन करण्याची सवय जडल्याचे ते सांगत. शिकण्याची प्रचंड तृष्णा त्यांना होती आणि त्यातूनच वाचनाची गोडी लागल्याचे दिसते. यशवंतरावांना घरातूनच शिक्षणाविषयी कुतुहल निर्माण करण्याचे कार्य त्यांचा मातेने केले, यामुळे शिक्षणाची शक्ती त्यांना कळाली आणि म्हणूनच समाजातील प्रत्येक घटकाने शिक्षण घ्यावे असा त्यांचा अट्टहास होता. यशवंतरावांच्या एकुणच शैक्षणिक वाटचालीबददल आणि त्यांनी शिक्षण क्षेत्रासाठी दिलेल्या योगदानाबददलचे महत्व आपणास प्रस्तुत शोधनिबंधातून स्पष्ट होते.

**निष्कर्ष :**

यशवंतरावांनी शैक्षणिक क्षेत्रात नविन विचार प्रस्तापित केले आणि शिक्षण हा सर्वांचा अधिकार असल्याचे सामान्य जनतेच्या निदर्शनास आणले. साहित्य क्षेत्राला नविन उभारी देण्यासाठी साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना केली. ज्यामुळे साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण उंचावला. नविन साहित्य व साहित्यिक महाराष्ट्रात निर्माण झाले.

**संदर्भसूची**

१. चव्हाण यशवंतराव, यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र-कृष्णाकाठ, खंड पहिला, प्रेस्टीज पब्लीकेशन्स, पुणे - १२ मार्च १९८७, पृ.२६.
२. शेवते अरुण, कृष्णाकाठचा माणुस, ॠतुरंग प्रकाशन, मुंबई - १ मे १९९३, पृ.११५.
३. मारवाडे नरेन्द्र, कृष्णाकाठ - एक आस्वाद, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद - १ आगस्ट १९९८, पृ.३८.
४. देशमुख शिवाजीराव, शैलीकार यशवंतराव, कौसल्या पब्लिकेशन, सोलापुर - २ एप्रिल २००९, पृ.६८.
५. जोशी रामभाऊ, यशवंतराव चव्हाण एक इतिहास, प्रतिभास प्रकाशन, परभणी - २५ नोव्हे २०१०.
६. पाटील आनंद, यशवंतराव चव्हाण चरित्रात्मक कादंबरी - सह्याद्री, साकेत प्रकाशन, औरंगाबाद - २००८, पृ.१२२.
७. मारवाडे नरेन्द्र,उपरोक्त, पृ.५५.
८. हेगे नागनाथ-संपा, जनामनातील यशवंतराव,पद्मगंधा प्रकाशन, पुणे - २३ फेब्रु २००२, पृ.४९.
९. महाराष्ट्राच्या भवितव्याची सफर, सह्याद्रीचे वारे, प्रसिध्दी विभाग, महाराष्ट्र सरकार, मुंबई - १९६२, पृ.१८.
१०. कायंदे पाटील गंगाधर, यशवंतराव चव्हाण, चैतन्य पब्लिकेशन्स, डिसेंबर २०००, पृ.१३९.
११. सुर्यवंशी उत्तम, मराठी मातीचे वैभव, सांगाती प्रकाशन, नांदेड - १९८९, पृ.१२४.
१२. कायंदे पाटील गंगाधर, उपरोक्त, पृ.१३५.
१३. हेगे नागनाथ-संपा, उपरोक्त, पृ.५०.
१४. माने डी. ए., शिल्पकार यशवंतराव चव्हाण, नयन प्रकाशन, ता. तासगाव, जि. सांगली, २६ जाने १९८९, पृ.३७.